# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार – ब

वर्ष १, अंक १२९]  शुक्रवार, फेब्रुवारी ५, २०१०/माघ १६, शके १९३१  [पृष्ठे ५
किंमत : रुपये २८.००

**असाधारण क्रमांक २०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ फेब्रुवारी २०१०

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मुवक. १५१०/प्र.क्र. ६/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे, आणि त्यामुळे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधण्यात

येईल) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्वप्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या उप-कलम (४) च्या परंतुकासह, उप-कलमे (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये सुधारणा करून खालील नियम करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) नियम, २०१० असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र मूल्यवर्धित नियम, २००५ (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधण्यात येईल) च्या नियम ४५ नंतर खालील दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"४५क. **संगणकीय प्रणालीद्वारे भरणा आणि परतावा.—** कोणत्याही नियमामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासन वेळोवेळी, **शासन राजपत्रात** अधिसूचनेद्वारे त्यामध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या कालावधीसाठी व्यापाऱ्यांचा वर्ग किंवा व्यापाऱ्यांचे वर्ग विर्निदिष्ट करेल,—

(क) त्यांनी संगणकीय प्रणालीद्वारे कायद्यान्वये देय कर, व्याज, शास्ती किंवा इतर कोणतीही देय रक्कम या नियमाला जोडलेल्या चलन नमुना एमटीआर-६ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये भरावी; आणि

(ख) ज्यांना कायद्यान्वये परताव्याचे वित्त प्रेषण देय असेल तर ते संगणकीय प्रणालीद्वारे किंवा उक्त प्रयोजनार्थ असलेल्या इतर प्रणालीद्वारे करण्यात यावे. "

“ चलन

एमटीआर-६

(नियम १७, १८, ४५ आणि ४५क पहा)

**लेखा शीर्ष**

| | | | |
|---|---|---|---|
| जीआरएन | | नमुना-आयडी | |
| विभाग | विक्रीकर विभाग | दिनांक | |
| भरण्याचा प्रकार | मूल्यवर्धितकर अधिनियम, २००२ | भरणा करणाऱ्याचा तपशील | |
| स्थान | | विभागाचा आयडी व्यापाऱ्याचा टीन | |
| कालावधी | | व्यापाऱ्याचे पूर्ण नाव | |
| पासून | पर्यंत | | |
| लेखा शीर्षाचा तपशील | सांकेतांक | रक्कम रुपयांमध्ये | शेरा असल्यास |
| कराची रक्कम | १ | | |
| टी.डी.एस.ची रक्कम | २ | | |
| व्याजाची रक्कम | ३ | | |
| शास्तीची रक्कम | ४ | | |
| आपसमेळ रक्कम | ५ | | |
| दंड | ६ | | |
| शुल्क | ७ | | |
| आगाऊ भरणा | ८ | | |
| जप्त केलेली रक्कम | ९ | | रक्कम अक्षरी : |
| ठेव रक्कम | १० | | |
| एकूण | | | |
| भरण्याचा तपशील | | प्राप्त करणाऱ्या बँकेच्या उपयोगाकरिता | |
| बँकेचे नाव | | बँक सीआयएन क्र. | |
| शाखेचे नाव | | दिनांक | |
| | | वेळ | |
| | | लेखापट (स्क्रोल) क्र. | |
| | | भरणा करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी.” | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चित्रा कुलकर्णी,**
शासनाच्या विशेष कार्य अधिकारी.